
सुबोध दिवाळी विशेषांक

ज्ञान प्रबोधिनीद्वारा ग्रामीण भागातील
कुमार मुला-मुलींसाठी,
कृतिशीलता जोपासणारे द्वैमासिक !

# छात्र प्रबोधन

सुबोध ग्रामीण द्वैमासिक
सौर आश्विन-कार्तिक शके १९४७
ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२५ वर्ष ११ अंक २



ज्ञान प्रबोधिनीद्वारा
छात्र प्रबोधन
सुबोध दिवाळी विशेषांक
शके १९४७ / इ.स. २०२५

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

खास ग्रामीण भागातील
कुमार वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी!
सुबोध ग्रामीण द्वैमासिक अंक
सौर आश्विन–कार्तिक शके १९४७
ऑक्टोबर – नोव्हेंबर २०२५
वर्ष ११ अंक २

# अंतरंग


## कथा
- आजोबांचं गुपित- फारूक एस. काझी ........................ ५
  - ✻ ऐका-कथा- खरी दिवाळी : संगीता पुराणिक ........................ ८
- ज्ञानाची दिवाळी- मल्हार अरणकल्ले ........................ २५
  - ✻ ऐका-गुजराथी कथा- नापास नाही पासः मृणालिनी कानिटकर.. २९
  - ✻ पाहा चित्रफीत- पाककृती अधीरसम ........................ २९
- गोंडवनची वीरांगना राणी दुर्गावती-सुहासिनी देशपांडे ... ३५
  - ✻ ऐका-ललित कथा- भाषेची गोडी : ले. एकनाथ आव्हाड .......... ३८

## कविता
- सोनेरी पहाट - तुषार लोहार ........................ ४
  - ✻ ऐका-ललित 'तळं' गावाचा आरसा' : ले-मुकुंदराज कुलकर्णी ........ ४
- नजर आमुची क्षितिजापुढती - डॉ. संगीता बर्वे ............ ३४
- उत्सव नात्यांचा - एकनाथ आव्हाड ........................ ४४

## ललित
- देवाशी नातं सांगणारा चित्रपट-देऊळ!-रुचिर कुलकर्णी ... १३
  - ✻ पाहा व ऐका-चित्रफीत-'क्षेत्रबलाकांची ताई....' : आरती देवगांवकर.... १५
- भटकंती-वनभ्रमंती - वरद बनसोड ........................ ३१
  - ✻ पाहा-वाघाच्या भटकंतीचे काही क्षण ........................ ३३
  - ✻ पाहा व ऐका पानांखालील माहितीपर ओळीतील वाद्ये ............ ३३
- सुगीची समृद्धी आणणारा 'शरद' - कविता मेहेंदळे ...... ४१
  - ✻ वाचा-लेख -मराठीचे वाल्मिकीः ले-शैलजा देशमुख .................. ४३
- षटकार - अमृत सामक ........................ ४५

## माहितीपर
- निसर्ग आमचा गुरू!- डॉ. नंदा हरम ........................ ९
  - ✻ पाहा - ग्रॅफिनमुळे स्फटिकांमधील रंग ........................ ११
- स्वच्छतेचे राजा-राणी...- डॉ. कांचनगंगा गंधे ............... २४

## कृतिपर
- कलाकृती - अनोखं 'शुभेच्छापत्र'- शोभना साठे .................. १२
  - ✻ पाहा- कलाकृतीची चित्रफीत ........................ १२
- विज्ञान - 'शाई बोटं'- सौरभ दुर्गेकर ........................ ३९

## मुलांचे पान
- कविता- जाणता राजा-चि. शौर्य नाईक ........................ ४०
- पेनाचे मनोगत - कु. श्रावणी गोरपेकर ........................ ४०

## लेखमाला - माझी बंडखोरी.....
- तिमिरातून तेजाकडे- प्रवीण इंगवले ........................ १७
- फुटबॉलपटूचा ध्यास-अंजू तुरंबकर ........................ १९
- आकार देणारा मूर्तिकार- जयंत टोले ........................ २१
  - ✻ पाहा-जयंतरावांच्या कलाकृती, नेपथ्याच्या दृष्टिकोनातून मुलाखत ........................ २३

## अन्य विशेष...
- विज्ञानाभिमुखता ........................ २
- संवाद ........................ ३
- प्रबोधिनी पद्य- स्वप्न पाहूया उजळ उद्याचे
- राज्यस्तरीय अभिवाचन, हस्तलिखित स्पर्धांची माहिती ....... ४८
  - ✻ पाहा-गुगल फॉर्म, स्पर्धा तपशील

## संकीर्ण
- प्रश्नावली (४) शब्दभिंगरी (८), शब्द वर्तुळ, शब्द चौकट (१५), वैज्ञानिकांची नावे सांगा (२३), जरूर करून पाहा - पाककृती अधीरसम (२९) छात्र प्रबोधन संग्राह्य पुस्तकसूची (३०) ✻ , जरा डोकं चालवा (३८)


**मुखपृष्ठाविषयी** : सहकुटुंब दिवाळी साजरी करताना 'टाकावूपासून' अनोख्या पद्धतीने घराची सजावट करताना 'जलरंगात' साकारलेले बोलके मुखपृष्ठ

वाचा सुबोध दिवाळी अंक २०२४

अवश्य वाचा..पाहा..ऐका..
✻ हे लेख स्कॅन करा
त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR code scanner मोफत डाऊनलोड करून घ्या.

अंकातील कल्पक भेट 'आकर्षक आकाशकंदील' अवश्य करा. (कृती पान ४८ वर पाहा)

संपादक, प्रकाशक, मुद्रक : महेन्द्र सेठिया
मानद संपादक : शैलजा देशमुख
कार्यकारी संपादक : शिल्पा कुलकर्णी
साहा. कार्यकारी संपादक : स्मिता गुजर
अक्षर जुळणी : सुप्रिया कुलकर्णी
मुद्रित शोधन : तेजस्विनी देसाई
मुखपृष्ठ : कुडलैय्या हिरेमठ
मांडणी, सजावट : पद्मजा जोशी
शीर्षक लेखन : बाबू उडूपी, चैतन्य जोशी
चित्रकार : दीपक संकपाळ, शेखर पवार
अर्थ संकलन
वेदा भागवत, अपर्णा घाटे
प्रचार - वितरण
रूपाली बापट, ज्योती चौधरी, ज्योती पवार, विक्रम राठोड

प्रकाशन दिनांक : राष्ट्रीय सौर १६ आश्विन, शके १९४७, ८ ऑक्टोबर २०२५
संपर्क पत्ता - छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे - 411030 दूरभाष क्र. (०२०) २४२०७ १७४
संकेत स्थळ : www.chhatraprabodhan.org ऑनलाइन खरेदीसाठी www.jpprakashne.org

# ज्ञान प्रबोधिनी

**ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यसंस्कृतीचा पाया असलेले विशेष प्रबोधिनीपणाचे पैलू**

**भविष्याभिमुखता, उपासनाभिमुखता, समाजाभिमुखता, संघटनाभिमुखता विज्ञानाभिमुखता**

## विज्ञानाभिमुखता

कुतूहल असणे, ते शमविण्यासाठी निरीक्षण करणे, विविध घटनांमधील कार्य–कारण लक्षात येणे, त्यासाठी आवश्यक तेवढे प्रयोग करणे, निष्कर्ष मिळाले की पुन्हा प्रश्न विचारणे, म्हणजे विज्ञानाभिमुखता. असलेले विज्ञान वापरणे, नवीन संशोधन करणे, आज विज्ञानाने जे समजत नाही अशा गोष्टींशी संबंध आल्यावर आजच्या विज्ञानाच्या विरोधी न वागणे व आज विज्ञानाने न समजणाऱ्या गोष्टींची विवेकाने चिकित्सा करून त्यांचा स्वीकार करणे म्हणजे विज्ञानाभिमुखता.

## विज्ञानाभिमुखतेचे प्रबोधिनीतील आविष्कार

### ✻ विज्ञान व तंत्रज्ञानाबाबत आधुनिकातील आधुनिक असण्याचा प्रयत्न

- १९८४ पासून संगणक व २००१ पासून जैवतंत्रज्ञान यांचे पथदर्शक अध्यापन प्रबोधिनीच्या शाळांमध्ये सुरू व २०१५ पासून बांबू उत्पादन वाढीसाठी बांबू ऊती संवर्धन (टिश्यू कल्चर)चे प्रयोग.
- केंद्रशासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागासाठी खतांचा व कीटकनाशकांचा विश्वकोश प्रकल्प
- नवनिर्मिती, समस्यापरिहार यांच्या प्रशिक्षणासाठी लेझर कटर, लेथ मशीन, थ्री–डी प्रिंटर्स, इलेक्ट्रॉनिक्स साहित्य इ. ने युक्त 'धडपड' प्रयोगशाळा, अटल धडपडालय, शिवापूर येथे कौशल्य प्रशिक्षण केंद्र इ. प्रयोगशाळा कार्यरत.
- २०२३ पासून शेती उपयोगी कवकाच्या उत्पादनासाठी 'ट्रायकोडर्मा प्रयोगशाळा' हराळी येथे सुरू.

### ✻ संशोधनाची परंपरा

- बुद्धिमंतांचे शिक्षण, प्रतिभा, वाचनवेग, सामाजिक जाणीव, वैज्ञानिक प्रतिभा, नेतृत्वगुण इ. विषयांवर मूलभूत संशोधन व त्यांच्या संवर्धनासाठी प्रशिक्षणाचे कार्यक्रम.
- मानसशास्त्रीय संशोधनाच्या आधारे प्रशिक्षण कार्यक्रम व प्रशिक्षणातील अनुभवांच्या आधारे नवे संशोधन ही प्रक्रिया सातत्याने चालू.

### ✻ कार्यपद्धतीतून वैज्ञानिक दृष्टिकोनाची जपणूक

- ५० वर्षांपासून विविध प्रकारच्या प्रकल्प पद्धतींचा अभ्यासक्रमात समावेश.
- समाजामध्ये विज्ञानाभिमुखता वाढवण्यासाठी प्रकल्प शिबिरे, विज्ञान शिबिरे, विज्ञान प्रदर्शने
- विज्ञान शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचे भारतभर आयोजन, शाळांमध्ये नित्य प्रशिक्षणे, विज्ञान स्पर्धा
- धार्मिक व शैक्षणिक संस्कारांमधील कर्मकांडाला तर्कबुद्धीच्या निकषावर आधुनिक हेतुपूर्ण रूप.
- 'भविष्यवेध' तंत्राचे शालेय विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व ज्ञान प्रबोधिनीच्या वाटचालीच्या नियोजनासाठी संस्थापातळीवर देखील वापर.

**संस्थात्मक व संघटनात्मक कामाची क्षेत्रे**

**शिक्षण । संशोधन । ग्रामविकसन । आरोग्य । नेतृत्व विकसन । स्त्रीशक्ती प्रबोधन । राष्ट्रीय एकात्मता**

मुख्य कार्यालय : ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०, ☎ ०२०–२४२०७००० www.jnanaprabodhini.org

**प्रिय प्रबोधकांनो,**

**‘सर्वप्रथम दिवाळी व नूतन संवत्सराच्या तुम्हाला हार्दिक शुभेच्छा!’**

दिवाळीच्या खमंग फराळाबरोबर तुमच्या विचारांना चालना देणारा, बुद्धीला खाद्य पुरवणारा हा **‘अक्षर फराळ’** तुमची दिवाळी अधिक अर्थपूर्ण, समृद्ध करेल, असा विश्वास वाटतो. महाराष्ट्रातील गावा-गावांतील, वाड्या-वस्त्यांतील १२ हजार मुला-मुलींपर्यंत हा दिवाळी अंक पोहोचवताना विशेष आनंद होतो आहे. यंदाही दिवाळी अंकातील काही लेखांना ‘क्यू-आर कोड’ जोडले आहेत. ते स्कॅन करून त्यातील साहित्य ऐका/वाचा/पाहा आणि त्याही साहित्याचा आस्वाद घ्या!

तुमच्या आसपास घडणाऱ्या गोष्टींबाबत, घटनांबाबत तुम्ही जागरूक असता का? त्यात ‘काय योग्य-काय चुकीचं घडतंय’ असा विचार तुमच्या मनाला स्पर्शून जातो का? त्यावर तुम्ही तुमची मतं घरी आई-वडील-भावंडांपाशी, शाळेत बाईंना, मित्रांना-मैत्रिणींना बोलून दाखवता का? व्यक्त करता का? चुकीच्या घडणाऱ्या कोणत्या गोष्टीत काय बदल करायला हवे आहेत असं तुम्हाला वाटतं? याबाबत तुमच्या पातळीवर तुम्ही उपाय शोधता का? ते बदल घडविण्यासाठी तुम्ही कधी प्रयत्न करता का? त्यासाठी इतरांचे सहकार्य, मदत मागता का? आपल्या आसपास असे विधायक बदल घडवण्यासाठी जो झटतो, तो इतरांपेक्षा वेगळा ठरतो, ‘बंडखोर’ ठरतो, तो वरील सर्व ‘कां’चा पाठपुरावा करतो व त्याच्या परीने उत्तरं शोधतो.

अशा तीन वेगवेगळ्या क्षेत्रांतील ‘बंडखोर’ कर्तृत्ववान व्यक्तींच्या कहाण्या ‘माझी बंडखोरी’ या विशेष लेखमालेत तुम्ही वाचणार आहात. समाजात असलेल्या अनिष्ट प्रथेविषयी आवाज उठवणारे पोलीस अधिक्षक **‘प्रवीण इंगवले’**! स्वत:मधल्या व विद्यार्थ्यांमधल्या कलेला उत्तेजन देण्यासाठी, फुलवण्यासाठी शालेय प्रशासनाविरुद्ध बंड करणारे कलाशिक्षक **‘जयंत टोले’** आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर *फुटबॉल* खेळण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी कुटुंबाशी, समाजाशी बंड पुकारलेली आंतरराष्ट्रीय क्रीडापटू **‘अंजू तुरंबेकर’** यांच्या प्रेरणादायी कहाण्या तुम्ही जरूर वाचा! असे विधायक बदल घडवण्यासाठी झटणाऱ्या ‘बंडखोर’ माणसांचा तुमच्या आळीत, परिसरात, गावात शोध घ्या. त्यांच्याशी बोला, त्यांचे विचार जाणून घ्या, त्यांची मुलाखत घ्या, त्यांच्यापासून प्रेरणा घ्या. आपल्या आसपास, समाजात असे विधायक बदल घडवण्यासाठी तुम्ही **‘बंडखोर’** होणार ना...!

या दिवाळी अंकात भावपूर्ण, उत्कट, पराक्रमाच्या कथा, कविता दिल्या आहेत. अनुभवपर, माहितीपर लेख आहेत, त्याचबरोबर वेगवेगळी कोडी, विज्ञान प्रयोग दिले आहेत. ती कोडी सोडवा, तशा प्रकारची कोडी तुम्ही स्वतः तयार करून मित्रांना सोडवायला सांगा. विज्ञान प्रयोग करून पाहा. शिवाय त्यामागील विज्ञान तत्त्व जाणून घ्या. **‘कल्पक भेट’ म्हणून आकर्षक आकाशकंदील** दिला आहे. तो आकाशकंदील लावून तुमच्या घरच्या दरवाज्याला सुशोभित करा. अंकांतील सांघिक आणि वैयक्तिक स्पर्धेत सहभागी व्हा! हा दिवाळी अंक कसा वाटला, हे आम्हाला कळवायला विसरू नका!

**‘स्वत:पासून ते समाजापर्यंत विधायक बदल घडवण्याची प्रेरणा’ या दिवाळीच्या निमित्ताने तुम्हाला मिळो, यासाठी खूप शुभेच्छा!**

**तुमची**
**शिल्पाताई**

कविता

# सोनेरी पहाट



पहाट झाली सूर्य उगवला
हसल्या साऱ्या दिशा।
नभपटलातून लोप पावती
चंद्रतारका कशा।।ध्रु.।।

दवबिंदूंनी साज चढविला
नवथर या भूमीला।
गाऊ लागले पक्षी सारे
या रम्य पहाटेला।।१।।

थव्याथव्यांनी पक्षी उडती
कोकीळ कुहूकुहू गाती।
रंगबिरंग फुलाफुलांतून
भ्रमर पुन्हा खेळती।।२।।

सूर्यरथाची लगाम घेऊन
सूर्यकिरण धावती।
रूपमनोहर चैतन्याचे
सर्व जगा दाविती।।३।।

मेघ धावती वाऱ्यासंगे
मातीमधुनी वाट पळे।
अंगणामधल्या तुळशीभोवती
मांगल्याचा दीप उजळे।।४।।

आकाशाच्या माथ्यावरती
लाल, केशरी गंध दिसे।
मन:पटलावर चित्र देखणे
रम्य पहाटेचे उमटे ठसे।।५।।

– **तुषार लोहार, उपशिक्षक,** प्रताप विद्या मंदिर, चोपडा, जिल्हा – जळगाव, **चित्रकार : शेखर पवार**

## दिवाळी विशेषांकावर आधारित ही प्रश्नावली सोडवा आणि बक्षिसे मिळवा!

१) जसा चेतनला 'शरद ऋतू' आवडतो तसा तुम्हांला कोणता ऋतू आवडतो त्याचं वर्णन ८० ते १०० शब्दांत लिहून जरूर कळवा.
२) कवीच्या मन:पटलावर रम्य पहाटेचे चित्र कसे उमटले आहे, त्याचे वर्णन लिहा.
३) यशवंतचे कोणते स्वभावविशेष तुम्हाला भावले व का ते स्पष्ट करा.
४) आजोबांना त्यांची चूक कळण्यासाठी शाळेच्या बाईंनी कोणती युक्ती केली?
५) संपादकांना पत्र लिहून दिवाळी अंकाचा अभिप्राय तसेच पुढील वर्षाच्या दिवाळी अंकात काय वाचायला आवडेल ते कळवा (१०० ते १५० शब्दांत)! सर्व प्रश्नांची उत्तरे आम्हांला सोबत दिलेल्या मेलआयडीवर जरूर कळवा. **chhatra.spardha@jnanaprabodhini.org**

**अंक वाचणाऱ्या प्रत्येक शालेय विद्यार्थ्याला स्पर्धेत सहभागी होता येईल.**

**विशेष गुणवत्ताप्राप्त पहिल्या १० स्पर्धकांना छात्र प्रबोधनतर्फे विशेष बक्षीस!**
**(रु. १००/–पुस्तकरूपाने)**

या प्रश्नांची उत्तरे 'छात्र प्रबोधन'च्या पत्त्यावर पाठवा. पाकीटाबरोबर आपले नाव, फोन नंबर, संपूर्ण पत्ता, शाळा, इयत्ता जरूर लिहावी. वरील प्रश्नांची उत्तरे पाठवण्याचा अंतिम **दिनांक ३० नोव्हेंबर २०२५**

**जरूर ऐका!**
**'तळं' गावाचा आरसा**
ललित :
मुकुंदराज कुलकर्णी
वाचनस्वर :
पियुष ओझर्डे

पोशाख नवनवे, नवी-नवी नवलाई, विपुलता पाहूनि, मनात हरखून जाई।
हा तलम घेऊ, कि तो घेऊ जरतारी? दीपावली आली ।।

✻ शुभेच्छुक ✻


• एक हितचिंतक, छ. संभाजीनगर • सौ. कस्तुरी व श्री. आदित्य मोडक, मुंबई
• सौ. प्राजक्ता जोशी–अदवंत, पुणे, स्वातंत्र्य सैनिक कै. दत्तात्रय लक्ष्मण जोशी स्मृतिप्रीत्यर्थ

कथा

# आजोबांचं गुपित

– फारूक एस. काझी

**नातू व आजोबा या दोहोंच्या नात्यांमधील सैल झालेला नाजूक धागा अलगदपणे कसा घट्ट जोडला जातो, हेच या कथेचे मर्म!**



''कसले पोहे केलेत हे? ना मीठ-मिरची ना चव!'' आजोबांचा आवाज आला आणि छोटा दीपेश झोपेतून घाबरून उठला. बाबा उठून बाहेर आले.

''काय झालंय आण्णा? सकाळी-सकाळी काय सुरू केलं तुम्ही?'' बाबा वैतागले.

''मला कशाला विचारतोस? तुझ्या बायकोलाच विचार- पोहे केलेत, त्यात ना मीठ, ना मिरची, ना कसली काही चव.''

आता काहीतरी मोठ्ठं भांडण होणार असं दीपेशला वाटलं; पण आजोबा उठून बाहेर निघून गेले.

आई मुसमुसत होती.

''रोजचंच झालंय हे. रोज काहीतरी उणिवा काढतात आणि असं मोठ्याने ओरडून बोलतात, चिडतात. काल तर सगळ्यांसमोर ओरडले माझ्यावर,'' आई सांगत होती.

''आणि काल, मला पण धपाटा दिला त्यांनी.'' दीपेशने पण तक्रार केली.

बाबा विचारात पडले. बाबा त्यांच्या वडिलांना आण्णा म्हणायचे. आण्णा काही महिन्यांपूर्वी इकडे शहरात आले होते, गावाकडे नोकरी करायचे. चार वर्षांपूर्वीच आज्जी कोविडमध्ये गेली; आणि आण्णा एकटे पडले. आता तर निवृत्त. गावाकडे कुणीच नाही लक्ष द्यायला; म्हणून त्यांना इकडे शहरात आणलं.

''आण्णा, असं ओरडून नका बोलत जाऊ तुम्ही. चार लोक आसपास असतात, ऐकतात. काय बोलत असतील लोक? तुम्हांला नाही आवडली एखादी गोष्ट तर शांतपणे सांगा. ओरडू नका प्लीज.'' बाबा आण्णांना समजावून सांगत होते.

''मला जसं वाटतंय तसं

यापुढील कथा मूळ अंकात वाचा.

**माहिती घ्या : रांगोळी : अल्पना (बंगाल)**
**तांदळाची पिठी पाण्यात कालवून त्यापासून रांगोळी काढली जाते.**

✲ शुभेच्छुक ✲

• डॉ. राधा संगमनेरकर, पुणे • सौ. प्रतिभा प्रभुदेसाई, रत्नागिरी
• श्री. शैलेंद्र केळकर, सांगली



माहितीपर

# निसर्ग आमचा 'गुरू'

– डॉ. नंदा हरम

निसर्ग हळूहळू उत्क्रांत होत शेवटी माणसाची निर्मिती झाली. म्हणजेच निसर्गातील प्राणी, पक्षी, वनस्पती हे माणसापेक्षा कितीतरी आधी पासूनच्या काळात उत्क्रांत होत गेले. त्यामुळे त्यांच्या रचनांचे (रंग, रूप, आकार, जडणघडण इ.) यांचे अनुकरण करत माणूस अनेक शोध लावत आहे या शास्त्रालाच 'बायोमिमिक्री' असं म्हणतात. या शास्त्राचा मनोरंजक परिचय विविध उदाहरणांच्या साहाय्याने डॉ. नंदा हरम यांनी करून दिला आहे.

आपल्या सभोवताली निसर्गाची विविध रूपं बघून आपण हरखतो, त्यातील विविध रचना असलेली रंगीबेरंगी फुलं, फुलपाखरं, पक्षी, प्राणी आणि बरंच काही... त्यांची नक्कल करण्याची ऊर्मी मनात दाटून येते. या निसर्गाचं आकर्षण वैज्ञानिकांनाही आहे. तुम्ही म्हणाल, तीही माणसंच ना! मग असणारच. मात्र त्यामागचं कारण वेगळं आहे, कसं ते सांगते.

वैज्ञानिकांच्या संशोधनात लक्षात आलं की, या आधी निसर्गात अस्तित्वात असलेल्या गोष्टी परिपूर्ण आहेत. त्याला कारण आहे; निसर्ग ४०० करोड वर्षांपासून अस्तित्वात आहे. तर आपण म्हणजे मानव केवळ ३ ते ४ लक्ष वर्षांपासून या भूतलावर नांदतो आहे. उत्क्रांती होण्यासाठी निसर्गाला बराच काळ मिळाला. त्यामुळे त्यांच्या रचना, प्रक्रिया अचूकपणे काम करतात. म्हणूनच शास्त्रज्ञ निसर्गाचा बारकाईने अभ्यास करून, त्यातून प्रेरणा घेऊन मानवी गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या तऱ्हेच्या अभ्यासाला **'बायोमिमिक्री'** म्हणतात. हा शब्द *'बायॉस'* (Bios) आणि *'मिमेसिस'* (Mimesis) या ग्रीक शब्दांच्या संयोगाने बनलेला आहे.

साधारण १९५० साली **ऑटो श्मिट** यांनी **'बायोमिमिक्री'** ही संज्ञा वापरात आणली. याचा प्रसार आणि प्रचार मुख्यत्वे १९९७ साली जनिन बैनायुस (Janine Benysus) यांनी लिहिलेल्या पुस्तकाने झाला. 'बायोमिमिक्री' या विषयावर काम करणाऱ्या संस्था 'अमेरिका, चीन, फ्रान्स, जपान, ग्रेट ब्रिटन आणि जर्मनी या देशांमध्ये कार्यरत आहेत. निसर्गातील प्राणी, पक्षी, वनस्पती इ.च्या रचना तसेच प्रक्रिया यांचा बारकाईने अभ्यास करून, त्याचा उपयोग नवीन तंत्रज्ञान तसंच उत्पादने विकसित करण्यासाठी केला जातो. थोडक्यात मानवी समस्यांवर उपाय शोधले जातात.

निसर्ग नेहमीच कमीत कमी ऊर्जा खर्च करून अतिशय कार्यक्षमतेने काम करीत असतो. तुम्हाला 3R हा नियम माहीत असेल! Reduce, Reuse, Recycle (बचत, पुनर्वापर, पुनर्चक्रित) पण एक लक्ष ठेवायचं की, निसर्गाचा अभ्यास करून एखादं उत्पादन बनविणं एवढं सुलभ

(आ. क्र.१ राईट बंधूचे पहिले विमान)



यापुढील लेख मूळ अंकात वाचा.

माहिती घ्या : रांगोळी : रंगवल्ली (महाराष्ट्र)
भूमितीचा आविष्कार पाहायला मिळत असून प्रमाणबद्धता दिसून येते.

✻ शुभेच्छुक ✻

• डॉ. सुखदा कुलकर्णी, पुणे • श्री. संजय प्रधान, सातारा
• श्री. विकास देशपांडे, सातारा





कृतीपर

# अनोखं ‘शुभेच्छापत्र’

– शोभना साठे





**साहित्य :** पांढरे कार्डशीट (२८ सेमी. रुंदी, ३६ सेमी. लांबी) लाल रंगाचा जाड कागद (१० सेमी. X ८ सेमी.), पांढरा-पिवळा कागद साधारण (७ सेमी. X ७ सेमी.) चा तुकडा, मोती, पेन्सिल, कात्री, फेव्हिकॉल इ.

**कृती :**


- ➢ प्रथम पांढऱ्या रंगाचं कार्डशीट घ्या व ते मध्यभागी दुमडा.
- ➢ लाल रंगांचा कागद घेऊन ७ सेमी. वरच्या व खालच्या बाजूस ३ सेमी. अशी खूण करून घ्या. आकृतीप्रमाणे आकार द्या व कापा. हा कापलेला भाग आकृतीत दाखविल्याप्रमाणे पांढऱ्या कार्डशीटवर चिटकवा.(आ.क्र. १)
- ➢ आता पानांसाठी पांढऱ्या व लाल रंगाच्या कागदावर छोटे-छोटे आकार काढून कापून घ्या. (आ.क्र. २)
- ➢ हे पानाचे आकार आकृतीत दाखविल्याप्रमाणे पांढऱ्या भागावर लाल पाने व लाल भागावर पांढरी पाने अशा रचनेत चिटकवा. (आकृती ३)
- ➢ आकृतीत दाखविल्याप्रमाणे चिकटवून घ्या. (आकृती ४)
- ➢ आता ४ सेमी. रुंदीची व २५ सेमी. लांबीची लाल रंगाची पट्टी कापून घ्या. त्याच्या उलट सुलट घड्या (पंख्याप्रमाणे) घाला. मध्यावर दुमडून. सुटे पदर चिकटवा. म्हणजे पंख्याचा आकार तयार होईल. कडेला थोडे कट्स द्या. (याप्रमाणे दिव्याचा आकार तयार झाला.) (आकृती ५)
- ➢ आता पिवळ्या रंगाचा ७ X ७ सेमी. कागदाचा चौकोन घ्या. मध्यावर घडी घालून कापून घ्या, २ त्रिकोण मिळतील. एक त्रिकोण घेऊन मोठ्या व छोट्या बाजूकडे उलट सुलट घड्या घाला व मध्यावर दुमडून घ्या व सुटे पदर चिकटवून घ्या. (आता ज्योतीचा आकार तयार झाला.) (आकृती ६)
- ➢ तयार झालेला दिवा व ज्योतीचा आकार भेटकार्डाच्या पांढऱ्या भागावर चिकटवा. त्यावर १ मोती चिकटवा. (आ. ७) अशारीतीने भेटकार्ड खास दिवाळीसाठी तयार.



आकृती १



आकृती २


आकृती ३


आकृती ४


आकृती ५


आकृती ६




आकृती ७

जरूर पाहा!
कलाकृतीचा व्हिडिओ :

– **शोभना साठे,** रूपश्री अपार्ट, पर्वती, पुणे ९



आनंदाने घर हे झुलते, तोरण लेऊन दारी ।
मांगल्याला साद घालते, रंगांची ही उधळण न्यारी ।।

❋ शुभेच्छुक ❋

• हरताळकर हॉस्पिटल, डॉ. विकास हरताळकर, चोपडा, जळगाव
• मे. अमेय फ्लुईड कंट्रोल सिस्टीम्स् प्रा. लि., पुणे


माहितीपर

# देवाशी नातं सांगणारा चित्रपट - देऊळ

- रुचिर कुलकर्णी

मित्रांनो, ही गोष्ट आहे मंगरूळ या छोट्याशा गावात नव्याने स्थापन झालेल्या एका देवळाची आणि तिथे सुरू होणाऱ्या एका नवीन व्यवसायाची. कसला व्यवसाय? तर श्रद्धेचा व्यवसाय!!

चित्रपटाची गोष्ट सुरू होते केश्यापासून. तो मंगरूळ गावात गाई राखण्याचं काम करत असतो. अशाच एका दुपारी तो त्याच्या आवडत्या करडीच्या (गाईच्या) शोधात रानात वावरत असतो. शेवटी त्याला करडी सापडते, ती एका टेकडीवर, उंबराच्या झाडाजवळ. दुपारच्या उन्हात डुलकी काढायला केश्या उंबराखाली झोपतो. झोपेत त्याला एक स्वप्न पडतं. स्वप्नात त्याला दिसतात- गुरूदेव दत्त. ते प्रकट होऊन, त्याला दर्शन देत आहेत. तो लगेच झोपेतून जागा होतो. बघतो तर काय, करडी गाय त्याच्या मागे असलेल्या उंबराच्या झाडाला खेटून उभी; ज्याच्या खाली दत्त महाराज बसलेले दिसतात. केश्याच्या स्वप्नाला अजूनच




खतपाणी मिळतं.

केश्या लगेच पळतो भाऊंच्या (गावातले राजकारणी) घराकडे. गावातून पळतापळता तो ओरडत सुटतो, 'गावात दत्त आलेत!' गावकरी गोंधळतात. सुरुवातीला भाऊ आणि गावकरी केश्याच्या या बातमीला फार गांभीर्याने घेत नाहीत.

एव्हाना गावकऱ्यांची, तेथील युवकांची विचारसरणी,

यापुढील चित्रपटाचे परीक्षण मूळ अंकात वाचा.

**जरूर ऐका - तंतुवाद्य :** या वाद्यांत वेगवेगळ्या जाडीच्या तारा असतात. तारांना छेडले किंवा वाजवले जाते, तेव्हा त्या कंप पावतात व ध्वनी निर्माण करतात. उदा. **वीणा, सतार, सारंगी, गिटार, संतूर, व्हायोलिन इ.**




✻ शुभेच्छुक ✻

• सौ. जान्हवी जोशी-शहा, पुणे • श्री. अमित गाडगीळ, पुणे

• सौ. उमा बापट व श्री. अजित बापट, पुणे

# माझी बंडखोरी

'बंडखोरी म्हणजे विद्रोह, विरोध, उठाव!' जेव्हा वैयक्तिक स्वार्थापलीकडे आपल्या आजूबाजूला, समाजात घडणाऱ्या चुकीच्या गोष्टींविरुद्ध, प्रथेविरुद्ध, रचनेविरुद्ध आवाज उठविला जातो, तेव्हा ती बंडखोरी 'विधायक' कामासाठी केलेली असते! समाजात विधायक बदल घडावेत म्हणून क्रांतिकारकांनी, समाजसुधारकांनी वेळोवेळी बंड केलं! तुम्ही-आम्ही लहान-सहान गोष्टींसाठी विरोध दर्शवून केलेली एखादी चांगली गोष्ट हे सुद्धा 'बंड'च ठरतं! असं बंड करण्यासाठी नीडरपणे आपलं मत व्यक्त करण्यासाठी धाडस लागतं. आपले विचार कृतीत आणण्यासाठी 'झपाटलेपण' लागतं. कधी बंडखोरी एकेकट्याने करावी लागते, तर कधी सहकाऱ्यांना संघटित करून कृती करावी लागते!

अशा विधायक कामासाठी निर्भयपणे बंडखोरी केलेल्या विविध क्षेत्रांतील ३ कर्तृत्ववान व्यक्तींचे 'प्रेरणादायी अनुभव' या लेखामालिकेत तुम्ही जाणून घेणार आहात.

**प्रवीण इंगवले** मूळचे बिदाल गावचे, जिल्हा सातारा. शेतकरी कुटुंबात जन्मलेले. इंजिनिअरींगचे शिक्षण पूर्ण केल्यावर मिळालेली नोकरी न स्वीकारता UPSC परीक्षेची तयारी केली. IPS अधिकारी झाले. असा त्यांचा प्रवास! गावातील विधवांना सन्मानाने जगता यावं म्हणून त्यांनी बंड पुकारलं.

**अंजू तुरंबकर** कोल्हापूर जिल्ह्यातील रानशिवारात, गुराढोरांच्या सोबतीनं वाढलेली अंजू मातीशी घट्ट नातं असलं तरी आकाशाची ओढ तिला स्वस्थ बसू न देणारी! ज्या समाजात 'मुलं-मुली हा भेद करू नको' असं परोपरीनं समजावलं. घरच्यांच्या विरोधात जाऊन तिनं शालेय शिक्षण पूर्ण केलं. मुलांची मिरासदारी असलेल्या *'फुटबॉल'* क्षेत्रांत नावलौकिक मिळवलं. सध्या अजून काही अंजू घडविण्यासाठी पुन्हा आपल्या मातीकडे वळते. या तिघांच्या बंडखोरीच्या कहाण्या तुम्हाला प्रेरित करतील व चुकीच्या गोष्टींविरुद्ध बंड करायला प्रवृत्त करतील!

**जयंत टोले** शाळेपासून रंग-रेषांबरोबर या कलाकाराचा प्रवास! सुरुवातीलाच घरच्यांविरुद्ध बंड करावं लागलं. नंतर स्वत: कलाशिक्षक झाल्यानंतर विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा म्हणून शाळा, प्रशासनाविरुद्ध बंड केलं. परंतु कालांतराने पाठिंबा असा या कलाशिक्षकाचा प्रवास.

## तिमिरातून तेजाकडे



*- प्रवीण इंगवले -*

मुळचे बिदाल, जिल्हा सातारा येथील असून सध्या मुंबई येथे (पोलिस अधिक्षक, राष्ट्रीय तपास यंत्रणा.) कार्यरत महाराष्ट्र व गोवा कार्यक्षेत्राचा कार्यभार पाहत आहेत.

दिवाळी अंकासाठी 'माझी बंडखोरी' या विषयावर लिहायचं म्हटल्यावर मी माझ्या आजवरच्या जीवनाकडे मागे वळून पाहिलं. त्यावेळी सर्वप्रथम आठवला तो शाळेत असताना मी घेतलेला एक निर्णय ज्याला एकप्रकारे बंडखोरी म्हणता येईल.

अधिक जाणून घेण्यासाठी मूळ अंकात वाचा.

जरूर ऐका : सुशीर वाद्य : यात पोकळ नळीमध्ये हवा भरून वाद्यातील छिद्रे बोटांनी उघडझाप करून स्वरांची निर्मिती केली जाते. उदा. बासरी, शहनाई, अलगोजा, तुतारी इ.

✽ शुभेच्छुक ✽

• चि. कणाद नरेंद्र गोडसे, निगडी, पुणे

• सौ. शिल्पा कुलकर्णी पुणे - कै. मधुसूदन अनंत भिडे स्मृतिप्रीत्यर्थ



कथा

# ज्ञानाची दिवाळी

– मल्हार अरणकल्ले

त्या दिवशी यशवंतच्या वाडीत आनंदाची दिवाळी बहरली, त्याच्या आईच्या डोळ्यातील अश्रूंच्या थेंबांची जणू कौतुकाची फुलं झाली. या वर्षीपासून त्याच्या वाडीत दिवाळी ही 'ज्ञानाची दिवाळी' म्हणून साजरी केली जाऊ लागली.
याचा अर्थ समजायला हवा असेल, तर ही कथा वाचायलाच हवी...!

आठवीच्या वर्गात नव्यानंच आलेल्या विद्यार्थ्याने काही दिवसांतच सगळ्यांना आपलंसं केलं. त्यामुळे नंतर नवीन कुणी वर्गात आलं की, त्याच्याशी मैत्री करावी, असं वर्गातल्या प्रत्येकालाच वाटू लागलं.

या मित्राचं नाव यशवंत. त्याचं गाव शहरापासून तीस किलोमीटरवर डोंगराच्या कुशीत. खरं म्हणजे चाळीस-एक घरांची छोटी वाडीच. एकमेकींना बिलगून असलेल्या झोपड्या, कुडाच्या भिंती आणि वाळलेल्या गवतकाठ्यांचं छप्पर. पाऊलवाटांचे रस्ते. वाडीत शाळाच नव्हती. तिथली मुलं-मुली जवळच्या गावातल्या शाळेत पायीच जायची. एसटी डोंगराला वळसा घालून जायची; परंतु वाडीतल्या लोकांना ती सोयीची नव्हती. वाटेत मोठी नदी, उंचच उंच डोंगर होता. दोन्ही ओलांडून जाणं कठीणच! त्या गावातील शाळाही सातवीपर्यंतच. यशवंत त्याच शाळेत जायचा. तो हुशार होता; पण त्याच्याकडे पुरेशी पुस्तकंही नव्हती. तो मित्रांच्या पुस्तकांवरून अभ्यास करायचा. वर्गातील मुलं यशवंतला मदत करायची.

यशवंतचे वडील त्याच्या लहानपणीच गेल्यामुळे त्याला ते आठवतही नव्हते. घरात त्यांचा *फोटोही* नाही. गरिबांना तेव्हा *फोटो* काढून घेणं ही चैन वाटे.

आई एकदा यशवंतला घेऊन जवळच्या गावात जत्रेला गेली होती. जत्रेत खाऊची दुकाने, पाळणे, गृहोपयोगी वस्तू, खेळण्यांची दुकानं, त्याचबरोबर तंबूतला फोटो स्टुडिओही

या पुढील कथा
मूळ अंकात वाचा.



✽ शुभेच्छुक ✽
• डॉ. स्नेहल तोडरवाल, नाशिक रोड, नाशिक
• सौ. हेमांगी पुजारी, पुणे • श्रीमती शिरीषा खरे, गिरगाव, मुंबई





आजच खरेदी करा!

# ज्ञान प्रबोधिनी-छात्र प्रबोधनची खास कुमारांसाठी संग्राह्य पुस्तके

## समृद्ध आशय, तज्ज्ञ लेखक, आकर्षक छपाई, माफक किंमत!

वितरण : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - ३० ☎ ०२०- २४२०७१७४/१७५

ऑनलाइन खरेदीसाठी jpprakashane.org या संकेतस्थळावर उपलब्ध

स्वत:साठी व भेट देण्यासाठी

भारत सासणे, प्रवीण दवणे, आश्लेषा महाजन, सुहासिनी देशपांडे, अनघा भट-बेहरे, कविता मेहेंदळे, मल्हार अरणकल्ले, शैलजा देशमुख, अशोक निरफराके, प्रकाश तुपे, नलिनी गुजराथी, वर्षा जोशी, अंजली कुलकर्णी, कांचनगंगा गंधे, वसंत गोवारीकर, वि. वि. पेंडसे, स्वर्णलता भिशीकर, दिलीप कुलकर्णी इ. मान्यवर लेखकांची दर्जेदार पुस्तके! (★ पुरस्कार प्राप्त पुस्तके)

**त्या-त्या प्रकारच्या पुस्तकांची झलक त्या त्या ठिकाणच्या QR Code ला जोडली आहे. अवश्य पाहा !**

### ❊ कथासंग्रह
- रस्काझी-रशियन कथा ....... १००
- प्रेरक कथा.. ....... ८०
- कहाणी दोन भावांची....... ५०
- विंचू चावला होऽऽ आणि इतर कथा....... १३०
- तू मोठ्ठा कधी रे झालास? ....... ११०
- किमयागार ★ ....... १८०
- मृदू भाव जागे होता ....... १६०
- राम आणि श्यामच्या अद्भुत साहस यात्रा....... १६०
- चलो मिरॅमॅक आणि इतर अद्भुत कथा ★ ....... १२०
- अभिरवच्या जासूसकथा ....... १००
- When Goodness Prevails....... १६०

### ❊ ललित लेखसंग्रह
- जिद्दीची गुरूकिल्ली ....... १००
- बकुळफुलं ....... ६०
- अंधाराचे डोळे ★ ....... ११०
- कागदी होड्या ....... १३०
- हट्टी व्हा हट्टी ....... ७०

### ❊ कविता/काव्यपंक्ती संग्रह
- कवितेच्या गावा....... ७०
- शब्दांची रत्ने ....... ६०
- जपून ठेवू सृष्टी... नाती....... ८०

### ❊ रसग्रहणात्मक लेखसंग्रह
- गंध मोहवी काव्याचा भाग १ व भाग २....... ७०/७०
- पाहिलेच पाहिजे असे काही भाग १/भाग २ ....... १३० /१००
- वाचलेच पाहिजे असे काही भाग १,२,३ ....... ५०/५०/४०
- काव्यगंधाची रसयात्रा ....... १२०
- आस्वाद बहुरंगी साहित्याचा ....... १२०

### ❊ माहितीपर पुस्तके
- छंद आकाश दर्शनाचा....... १००
- दैनंदिन जीवनातील विज्ञान व तंत्रज्ञान ....... १५०
- मैत्री आयुर्वेदाशी....... १००
- वनस्पतींचे जीवन वैभव....... १५०
- वनस्पतींची जादुई नगरी ....... १३०

### ❊ व्यक्तिविकासाशी निगडित पुस्तके
- व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत भाग १ व २....... १३०/१३०
- कल्पक बनू या/ Be Creative....... १००/१५०
- प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास....... ७०
- पंख फुलवू या प्रतिभेचे -★ (मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराती आवृत्त्या)(प्रत्येकी)....... २५०
- तरंग मनाचे....... १३०
- उजळती वाट ....... ५०
- नियोजन कौशल्य ....... ६०
- भावनांच्या प्रांगणात....... १३०
- गीता-गीताई ....... ३०
- प्रबोधन गीते भाग १/भाग २....... ६०/५०
- रंगु अभंगांचे ठायी (अभंग पुस्तिका)....... ४०
- हरित संदेश/Green Messages ....... ३०/२०
- संवाद भाग १/२....... १३०/१५०

### ❊ प्रेरणादायी, अनुभवपर पुस्तके
- ध्यासपंथावरील दीपस्तंभ ....... १४०
- जिद्दीची लोभस रूपं ....... १५०
- आयुष्यातील वादळलाटा ....... १२०
- कथा इस्रोची ....... १२०
- आम्ही असे घडलो....... १६०
- हरिसिंह नलुआ....... ६०
- आमची जडणघडण....... १६०
- समाजशिल्पी आप्पा ....... ८०
- जिद्दीची डोळस रूपं ....... ३००

### ❊ अभ्यासविषयक पुस्तके
- असे घटते सुंदर अक्षर....... २५
- चला प्रकल्प करूया....... २००
- अभ्यासातील स्वावलंबन भाग १- अभ्यासाची पूर्वतयारी ....... १००
- अभ्यासातील स्वावलंबन भाग ३ - परीक्षा तंत्र १२०

### ❊ कलाकृतिपर पुस्तके
- त्रिमितीची किमया/ 3D Magic ....... १४०/१४०
- कागदी हस्तकलेच्या दुनियेत ....... ७०
- कलेच्या विश्वात....... ७०
- अभिवाचन एक कला....... ७०

### ❊ ४० पुस्तकांचे संच
- एक पानी ३ संच (प्रत्येकी) ....... ५००
- सहा पानी कथा संच/ कर्तुत्वाच्या कहाण्या (प्रत्येकी) ....... ६००
- एकांकिका संच (एकूण ८ पुस्तके) ....... २२५

**ज्ञान प्रबोधिनीतर्फे पालक व शिक्षकांसाठी इतरही अनेक पुस्तके प्रकाशित**

लक्ष लक्ष दिव्यांनी उजळू दे आकाश, होऊ दे दुष्ट शक्तींचा विनाश ।
मिळो सर्वांना प्रगतीच्या पाऊलवाटेचा प्रकाश, आज साजरा होवो आपला दिवाळी सण आज ।।



❊ शुभेच्छुक ❊



• श्री. विजय चिटणीस, पुणे • श्री. संतोष गायकवाड, पुणे
• श्रीमती स्नेहलता गणेश गद्रे, पालशेत, ता. गुहागर, जि. रत्नागिरी



# वन भ्रमंती

## जंगल सर्वेक्षणाच्या निमित्ताने

- **वरद बनसोड**

अमराबाद, 'जंगलाच्या आत निवास! ऐकायला फार मोहक वाटणारी ही एक कल्पना! काही वर्षांपूर्वी पहिल्यांदाच माझी ही कल्पना प्रत्यक्षात उतरली.

निमित्त होतं *'लाइन ट्रान्सेक्ट सर्वे'* अर्थात 'प्राणी गणना करण्याची एक शास्त्रीय पद्धत.' ह्या सर्वेक्षणाच्या निमित्तानं अमराबाद व्याघ्रप्रकल्पाच्या परिसरात चार दिवस निवास करण्याचा योग आला.

भारतामधील भौगोलिक वैविध्यपूर्णता असलेलं एक महत्त्वाचं ठिकाण म्हणजे 'पूर्वी घाट'! येथे महत्त्वपूर्ण अशी जैवविविधता आढळते. 'पूर्वी घाटा'तलं एक महत्त्वपूर्ण जंगल म्हणजेच 'नल्लमाला वन'. ह्याच भागात भारतातला सर्वात मोठा व्याघ्रप्रकल्प- 'नागार्जुन सागर, श्रीशैल्यम व्याघ्रप्रकल्प' आहे. तेलंगणा राज्याच्या निर्मिती पश्चात ह्या व्याघ्रप्रकल्पाचा जो भाग तेलंगणा राज्यात आला, त्याचं नाव 'अमराबाद व्याघ्रप्रकल्प' आहे.

अमराबादच्या जंगलात, जंगलाच्या बरंच आतमध्ये, एका तळ्याकाठी वन विभागानं बांधलेली छोटीशी 'कुटी' हे आमचं त्या चार दिवसांतलं घर. भवताली गर्द जंगल आणि असंख्य डोंगरदऱ्या अशा निसर्गरम्य परिसरात असलेली ती कुटी. आजूबाजूला मानवी वस्ती म्हणजे जवळच असलेला 'चेंचु' हा आदिवासी समाजाचा एक पाडा. तेवढा सोडल्यास, भोवताली वाहनानं गेल्यास २ तास आणि चालत ६ ते ८ तास एवढ्या अंतराशिवाय मुख्य रस्ता नाही आणि गावं, खेडी, मनुष्यवस्ती तर अजिबातच नाहीत.

या पुढील लेख मूळ अंकात वाचा.

अमराबादच्या जंगलात प्राणी-गणनेचं काम करायला गेलं असताना **वरद बनसोड** याने जंगल भटकंतीचा अनोखा अनुभव घेतला.
त्याला चितळ, हरीण यांच्यासारख्या प्राण्यांचं दर्शन तर घडलंच; पण तिथलं शांत, स्तब्ध वातावरण, पक्षी-प्राण्यांचे आवाज, थंडगार वारं, उन्हं, चांदण्यांनी भरलेलं आभाळ अशी निसर्गाची विविध रूपंही अनुभवायला मिळाली. हा सुंदर अनुभव ह्या लेखातून तुम्हालाही अनुभवता येईल.



**वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक रचना :** कच्छचे रण, **राज्य :** गुजरात, **प्रकार :** मीठाचे वाळवंट
**वैशिष्ट्य :** जगातील सर्वात मोठे खारट वाळवंट, विस्तार २३,२०० चौ. कि. मी. इतका आहे.

❋ शुभेच्छुक ❋
• डॉ. अभय व डॉ. वीणा लिमये, पुणे • सौ. गायत्री हर्डीकर, बोरिवली, मुंबई
• सौ. विधात्री फोंडेकर, बोरीवली, मुंबई

कथा

# गोंडवनची वीरांगना राणी दुर्गावती

– सुहासिनी देशपांडे



महाराणी दुर्गावती कनोजच्या चंदेल घराण्याच्या राजा किरतराय ऊर्फ कीर्तीवर्मन यांची एकुलती एक कन्या. दुर्गाष्टमीच्या मुहूर्तावर जन्मलेली म्हणून तिचे नाव 'दुर्गावती' ठेवण्यात आले. आपल्या या सुंदर सुकुमार लेकीस वाढविताना राजाने तिला क्षात्रधर्माचे सर्वांगीण शिक्षण दिलं होतं. रणांगणात ती रणरागिणी शोभली पाहिजे, म्हणून किशोर वयातच दुर्गावतीला ढाल-तलवार, दांडपट्टा, धनुर्विद्या, भालाफेक, गोळाफेक, घोडस्वारी असं युद्धाचं शिक्षण दिलं जात होतं. त्याचबरोबर रामायण-महाभारत या ग्रंथांचे संस्कार तिच्यावर केले जात होते. स्वदेश-स्वधर्म यावर जिवापाड प्रेम करावे आणि त्यांच्या रक्षणार्थ प्रसंगी प्राणांवर सुद्धा उदक सोडावे हा संस्कार तिच्यावर केला गेला.

जसजशी दुर्गावती वयात आली तसे, तिला साजेसा शूरवीर व तेजस्वी जोडीदार हवा अशी राजाची इच्छा होती. मात्र दुर्गावतीने गोंडवनाचा राजा दलपतिशाह यास आपला जीवनसाथी म्हणून मनोमन वरले. दलपतिशाह हा गोंड जमातीचा राजा अत्यंत तेजस्वी, शूरवीर होता. त्याच्या कर्तृत्वाच्या गाथा, त्याच्या कीर्तीचा परिमळ दशदिशांत

या पुढील कथा मूळ अंकात वाचा.

**पूर्वीच्या काळीही 'स्त्री'ला कमी न लेखता तिला इतर कलेबरोबरच 'क्षात्र' धर्मातील युद्धकलेचे शिक्षण देऊन तिला 'वीरांगना' बनविण्यात तिच्या आई-वडिलांचा कसा खूप मोठा वाटा आहे हे या कथेतून जाणून घ्या!**

**नैसर्गिकरित्या अद्वितीय भौगोलिक रचना :** बॅरेन बेट **राज्य :** अंदमान आणि निकोबार **प्रकार :** निर्जन बेट
**वैशिष्ट्य :** सक्रिय ज्वालामुखी (बंगालच्या उपसागरातील) अंदमान बेटांच्या समूहातील एक निर्जन बेट आहे.

✻ शुभेच्छुक ✻
• सौ. सुप्रिया राहुल भिडे, पुणे • डॉ. सौ. अश्विनी जोशी, पुणे
• श्री. अमित गद्रे, पुणे

विज्ञान

# शाई बोट
## एक मजेदार प्रयोग!/खेळ




**आवश्यक साहित्य :**

(मोगरा, जाई, जुई, लिंबू, पिंपळ) यांपैकी कोणत्याही एका झाडाचं छोटं पान, रिकामी पेनाची कांडी (निब काढलेली), शाई (इंक) किंवा फाउंटन पेनमध्ये असते ती शाई, एका पसरट भांड्यात पाणी, पावसाळ्यात आजूबाजूला असलेले डबकं.

**कृती :**

- वरीलपैकी एखाद्या झाडाचं टोकदार, हलकंसं छोटं पान तोडा.
- एका जुनी पेनाची कांडी घ्या आणि तिची *निब* काढून टाका.
- कांडीच्या मागून हळूवार फुंकर देऊन, थोडीशी शाई पानाच्या देठाजवळ, वरच्या बाजूस लावा.
- आता पावसाळ्यात साचलेल्या एखाद्या स्वच्छ डबक्यात किंवा एका पसरट भांड्यात हे पान अलगद ठेवा. शाई लावलेली बाजू वरती राहील याची काळजी घ्या.
- काही क्षणांतच तुम्ही पाहाल, तुमचं पान हळूहळू पाण्यावर बोटीप्रमाणे चालू लागेल!
- आता वेगवेगळ्या बाजूंना शाई लावून बघा पान कोणत्या दिशेने जाते?
- सरळ रेषेत जाण्यासाठी काय करावं लागेल याचा विचार करा.
- एकापेक्षा जास्त पाने तयार करा आणि तुमच्या मित्रांमध्ये '**शाई बोटीं**'ची शर्यत लावा!





**काय घडतंय इथे? (थोडंसं विज्ञान) :**

शाईमधील काही द्रव्ये पाण्यावर पसरतात आणि पृष्ठतणावात बदल करतात. त्यामुळे शाई लावलेली बाजू मागे ढकलली जाते आणि पान पुढे सरकते अगदी मोटार बोटीसारखं!

**टीप :**

शाई नसेल तर *स्ट्राँग डिओड्रंट* किंवा साबणाचा थोडासा द्रावही वापरता येतो.

– **सौरभ दुर्गेकर,** एम. एस. सी. भौतिकशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ

SSC बोर्ड, ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी
शिकवणी .COM
विषयागणिक ६० – ७० तास
माफक शुल्क
गणित / इंग्रजी / विज्ञान विषयाचे व्हिडीओ गाईड उपलब्ध ...
+91 9322534829
www.shikavani.com
info@shikavani.com



माहिती घ्या : रांगोळी : ऐपन (उत्तराखंड)
ऐपन म्हणजे कुमाऊँ भागात काढलेली पारंपरिक रांगोळी.

✻ शुभेच्छुक ✻

जिद्द, साहस, रंजकता यांचा मेळ भारी।
'छात्र प्रबोधन' सवे घेऊ उंच भरारी ।।

**जाणता राजा**

तो तेजोमय डोळा।
राजा अमुचा मराठमोळा।।१।।
युद्धातल्या सिंहाची गर्जना।
मराठी परंपरेचा तो कणा।।२।।
योगी तो श्रीमंत।
कीर्ती त्याची अनंत।। ३।।



त्याच्या एका आज्ञेवर।
लढे मावळे जीवापार।।४।।
निश्चयाचा महा-मेरू।
त्याच्या शिकवणीचं बीज पेरू।।५।।
तिन्ही लोकी गाजा-बाजा।
असा अमुचा शिवाजी राजा।।६।।

**– चि. शौर्य अजित नाईक, इ. ८ वी**
के – १००२, मधुकोष अपार्टमेंट फेज ३, धायरी पुलाजवळ, पुणे ४११०५१

## पेनाचे मनोगत

दिवाळीच्या सुट्टीतील धमाल करून झाली. सुट्ट्या संपून शाळा सुरू झाली. पहिल्याच तासाला बाईंनी वाचन घेतले. ते संपल्यानंतर मैदानावर जाण्याच्या गडबडीत माझ्या आवडीचं काळ्या रंगाचं पेन हरवलं. शोधता-शोधता 'नंतर शोधू' म्हणत आणि मैदानात जायला निघाले. तेवढ्यातच आवाज आला. मी आधी आजूबाजूला पाहायला लागले. मग टेबलाखालून आवाज आला. माझ्याशी कोणीतरी बोलतंय असा भास झाला.

*'हाय श्रावणी, अगं इकडे टेबलाखाली बघ नं. मी पेन बोलत आहे, तुझा रोजचा सोबती! माझा तुम्ही सर्वजण वेगवेगळ्या कामासाठी वापर करता. कार्यालये, शाळा, बँका या सर्वच ठिकाणी लोक माझा वापर सर्रासपणे करतात. जर मी नसतो, तर कोणीही वाचले-लिहिले नसते. माझ्या वाचून तुम्हा मुलांचं लेखन-काम थांबतं. तुम्ही फक्त माझ्या मदतीने लिहायला शिकता. मी अनेकांचे भविष्य घडविण्यासाठी मदत करत आहे, याचा मला अभिमान आहे. पण तुम्ही मात्र मला कुठं कुठं विसरून येता...! याचं मला वाईट वाटतं.*

*फक्त तुम्ही मुलंच नाही, तर बातम्या लिहिण्यासाठी पत्रकारही माझा वापर करतात. त्या बातम्या दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात येतात. ज्यामुळे समाजात जागृती निर्माण होते. समाजाला याची जाणीव करून देण्यासाठी मी काम करत आहे, याचा मला आनंद आहे. प्राचीनकाळी लाकडापासून ते अलीकडच्या बॉलपेनपर्यंतचा प्रवास हा तुम्हाला वाटतो तितका सोपा नव्हता. तुला माहीत आहे का मी तुझ्याकडे कसा आलो. दुकानातून बाबांनी विकत आणला व मला दिला. बरोबर ना!*

*हे बघ माझं म्हणणं ऐकायला पण तुझ्याकडे वेळ नाही. तुला मैदानावर जायची घाई आहे! ठीक आहे. आता तू म्हणशील तेव्हाच मी तुझ्याशी बोलेन.'*

श्रावणीने हळूच त्या पेनाला उचललं. त्याच्यावरची धूळ झटकली आणि कंपासमध्ये त्याला सुरक्षित ठेवलं. ठेवताना त्याच्यावर प्रेमाने हात फिरवला. एवढ्याने देखील पेन खूष झालं! *'आणि श्रावणी मी तुला अशीच साथ देईन'* असं म्हणत कंपास पेटीत ते विसावलं.

**– कु. श्रावणी बाळकृष्ण गोरपेकर,** मु. नारिवली, पो. वाकळन, ता. कल्याण, जि. ठाणे ४००६१२

पान क्र. ८ वरील शब्द भिंगरी उत्तर : १. उजळणी २. उठसूठ ३. उलगडा ४. उतावळा ५. उपस्थित ६. उहापोह ७. उदारता ८.उपहार



लक्ष लक्ष दिव्यांनी उजळू दे आकाश, होऊ दे दुष्ट शक्तींचा विनाश ।
मिळो सर्वांना प्रगतीच्या पाऊलवाटेचा प्रकाश, साजरा होवो आपला दिवाळी सण आज ।।
✻ शुभेच्छुक ✻
• सौ. चारुशीला व श्री. शरद केशव आवटे, पुणे
• श्री. शंतनू पटवर्धन, पुणे



# सुगीची समृद्धी आणणारा शरद

ललित

– कविता मेहेंदळे

दिवाणखान्यात आजी-आबा बसले होते. चेतन शाळेतून येऊन आवराआवर करून दिवाणखान्यात आला. सहजच बोलताना आजीने भन्नाट विषय सुरू केला!

चेतन, बेटा तुला कोणता 'ऋतू' आवडतो?'

''आजी, माझ्या वर्गात दोन 'ऋतू' आहेत. ऋतुराज आणि ऋतुपर्ण. मला ऋतुराजच आवडतो. मी *कंपॉस*, पेन काही विसरलो ना, तरी ऋतुराज मला सगळं देतो.'' चेतनच्या या उत्तरावर आजी-आबा भरपूर हसले. मग आबा म्हणाले, ''तसं नाही रे चेतन. मला वर्षाऋतू आवडतो. अर्थात श्रावण आणि भाद्रपद महिने.''

''नाही रे चेतन. ते महिने माझ्या आवडीचे तर आबांना 'वसंत'ऋतूचं कौतुक आहे,'' आजी घाईघाईने म्हणाली.


पाठोपाठ चेतन म्हणाला, ''म्हणजे... चैत्र आणि वैशाख. ते महिने होय? पाठ केले होते मी मागच्या वर्षी. आणि ऋतूंची नावं वसंत ऋतू, ग्रीष्म ऋतू. हीच ना!''

''पुरे-पुरे कळलंय आम्हाला तुला, हे समजलंय,'' आबा पुन्हा हसायला लागले. आता चेतननेही हसतहसत विचारलं, ''ही ऋतूंची गाडी म्हणजे ऋतूंची नावं कोणी आणि कशी ठरवली? का ठरवली? वर्षाचे महिने बारा आणि ऋतू मात्र सहाच का?''

''हो... हो... चेतन. किती प्रश्न एकदम विचारतोस? सांगते... सारं काही सांगते. हे बघ 'ऋ' या धातूचा अर्थ 'गती' (संस्कृत). निसर्गातील म्हणजेच वातावरणातील किंवा परिसरातील बदलांनुसार आपल्या पूर्वजांनी ऋतूंची विभागणी केली आहे. सण-समारंभ, पद्धती त्या-त्या हवामानाला पोषक ठरतील

या पुढील लेख मूळ अंकात वाचा.

**आपले सण-उत्सव, रीतीरिवाज हे ऋतूंशी कसे जोडले आहेत त्याचं दर्शन सोबतच्या लेखात तुम्हांला होईल.**





**माहिती घ्या : रांगोळी : अल्पना (संथाल)**
**आदिवासी जनजातींमध्ये विशिष्ट कार्यांसाठी काढली जाते.**

✻ शुभेच्छुक ✻
• सौ. वृषाली दिलीप अदवंत, पुणे • एक हितचिंतक, अंधेरी, मुंबई
• सौ. मीनल कुलकर्णी, डोंबिवली

नाट्यछटा

# षटकार...

**– अमृत सामक**

(हातात बॅट. एक *स्ट्रेट ड्राइव्ह शॉट* मारण्याची *ॲक्शन* करत) आणि हा अप्रतिम षटकार... (मैदानात उपस्थित प्रेक्षकांना अभिवादन करून, वर आकाशाकडे पाहून आनंद व्यक्त करत असताना अचानक थबकतो आणि डाव्या हाताला पाहून काही क्षण ऐकतो आहे.)

'अरे यार, काय गं आई तू असं करतेस.' आत्ता कुठे माझ्या सरावाला नीट सुरुवात झाली होती, तर लगेच काय तर म्हणे सरावापेक्षा *रियाज* महत्त्वाचा. आज सकाळी *रियाज* झालाय माझा. (आता थोडा वेळ *क्रिकेटचा* सराव करू दे मला.) जा तू आत्ता *प्लीज.* (या वेळेला काहीही झालं तरीही मला राज्यस्तरीय *क्रिकेट* स्पर्धेत निवड व्हायला हवी आहे.) (आई निघून गेली असं पाहून) हुश्श! (क्रिकेटच्या फलंदाजीचे काही हात आजमावत) हं... हे असं जमायला हवं. वाह क्या बात है! (अजून दोन-तीन वेळा फलंदाजीच्या हाताचा सराव करत असताना समोरून कोणीतरी येताना दिसते म्हणून थांबतो.) अरे यार! आता ही आली. आणखी डोक्याशी कटकट करणार माझ्या... (थोडं थांबून. समोरून येणारी व्यक्ती जवळ येऊन उभी राहिली आहे.) बोला... नाही. नकाच बोलू तुम्ही काही. तुमचं म्हणणं मला अगदी पाठ झालं आहे ताईसाहेब... (ताईच्या बोलण्याचा अभिनय करत) *क्रिकेटचा* सराव जितका महत्त्वाचा तितकाच अभ्यासातला सरावदेखील महत्त्वाचा. गणित, विज्ञान हे विषय सरावाशिवाय जमणं शक्यच नाही. आणि चांगली बुद्धिमत्ता असलेल्या माझ्यासारख्या मुलाने अभ्यासातल्या सरावाकडे दुर्लक्ष करणं, हा स्वतःच्या बुद्धिमत्तेचा अपमान करण्यासारखा आहे. (ताईसारखे बोलणे संपवत, अगदी हात जोडून) हो ताईसाहेब पाठ झालं मला हे भाषण... बुद्धिमान असणं हा काय गुन्हा आहे का? करतो गं बाई अभ्यास! करतो! नाही होणारे मी नापास बिपास... अगं हो... हो ... हो...जा तू आत्ता इथून... ही स्वतः अति अभ्यासू आहे, म्हणून हिला वाटतं मी पण तसंच असावं... (ती गेली आहे याची खात्री करून) (पुन्हा फलंदाजीचे काही हात सरावाने हलवीत फलंदाजीचा सराव करत असताना अचानक फोन वाजतो. त्यातून फोन काढून त्यावर नंबर बघतो. जीभ चावत स्वतः चीच) अरे बापरे, आता बाबांना काय सांगू? बाबा म्हणजे... तो इतका गोड बोलतो ना माझ्याशी, की त्याने सांगितलेलं ऐकायचं नाही असं करूच शकत नाही... (फोन उचलतो अतिशय प्रेमाने) हं...बाबा... बोल ना... अरे हो... नाही म्हणजे खरंतर... अरे पण करीन ना मी... घरी गेल्यावर नक्की करीन... हो हो... मी खात्री देतो ना तुला... पाठांतर होईल नीट माझं... अगदी नक्कीच... ठेवू बाबा आता फोन? (फोन ठेवतो) बाबाचं नाटकात *करिअर* करण्याचं स्वप्न पूर्ण व्हायला हवं होतं. ते नाही झालं म्हणून मला नाट्य वर्गाला घालून माझ्याकडून आता त्याला ते स्वप्न पूर्ण करून घ्यायचं आहे. कसं समजावून सांगू मी त्याला... नाही म्हणजे नाटक शिकायला आवडतं मला करायला ही आवडतं... *क्रिकेट* जास्त आवडतं ना त्याचं काय करू!? (थोडा विचार करून) काय करावं? काय करावं? काही

या पुढील नाट्यछटा
मूळ अंकात वाचा.

**जाणून घ्या : नृत्यप्रकार : कथकली, राज्य : दक्षिण भारत**
यात मुख्यत्वे करून चेहऱ्यावरील भाव, वेशभूषा यांद्वारे प्रतिकात्मक कथा सांगितली जाते. याला 'सुवर्ण कला प्रकार' म्हणून ओळखतात.

✽ शुभेच्छुक ✽
• डॉ. सचिन गांधी, पुणे • श्री. गिरीश पळसकर, बंगळूर, कर्नाटक
• श्रीमती लीलावती नारळीकर, पुणे

## ज्ञान प्रबोधिनी - छात्र प्रबोधन, पुणे व मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी, पुणे

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# राज्यस्तरीय सांघिक स्पर्धा !

सुप्त गुणांना गटकार्याद्वारे अभिव्यक्त होण्याची संधी!!

## १. अभिवाचन स्पर्धा (९ वे वर्ष)

**कोणासाठी - वयोगट : इ. ७ वी ते १० वी, विद्यार्थी संख्या : ६ ते ८**

(एका शाळेतील जास्तीत जास्त ३ संघ, वेगवेगळ्या शाळांमधील विद्यार्थी स्वतंत्रपणे गट करून सहभागी होऊ शकतील.)

- **स्वरूप - १. पराक्रम २. संवाद ३. सौंदर्य यांपैकी कोणत्याही एका विषयावर**
  **'छात्र प्रबोधन' मासिकातील साहित्यातून विविध साहित्य प्रकारांची निवड** करून,ते साहित्य एकत्र गुंफून **एकसंध संहिता** तयार करावी.
  **टीप - 'छात्र प्रबोधन'च्या दिनदर्शिकेतील वरील विषयावर आधरित कोणत्याही एका कथेचे नाट्यरूपांतर करून अभिवाचन करावे.**
- गटाने त्याचे **३० मिनिटांचे अभिवाचन** करावे.
- अभिवाचनाचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करून पेन ड्राईव्हद्वारा **छात्र प्रबोधनच्या पत्त्यावर ३१ डिसें. २०२५ पर्यंत पाठवावे.**
- **बक्षिसे - प्रथम ४०००/- द्वितीय ३०००/-, तृतीय २५००/- , उत्तेजनार्थ १५००/-** (सर्व बक्षिसे पुस्तकरूपाने)

## २. 'तुम्हीच संपादक व्हा!' हस्तलिखित स्पर्धा (२२ वे वर्ष)

- **स्पर्धा २ गटांमध्ये होईल. प्रत्येक गटात एका शाळेतील जास्तीत जास्त २ संघ सहभागी होऊ शकतील.**
- **९०% लेखन विद्यार्थ्यांचे असावे. १०% संकलन चालेल.**
- **खालील संपर्क पत्त्यावर हस्तलिखित पाठविण्याचा अंतिम दिनांक : ३१ डिसेंबर २०२५**

**मोठ्या संख्येने सहभागी व्हा !**

## दोन्ही स्पर्धांसाठीचे सामाईक तपशील

**नावनोंदणी: स्पर्धांसाठी प्रवेश शुल्क नाही.** दोन्ही स्पर्धांसाठी **गुगल फॉर्मद्वारा नोंदणी करणे आवश्यक!** स्पर्धेबाबतचे अन्य तपशील, मूल्यमापनाचे निकष **QR Code** स्कॅन करून समजून घ्यावेत.

**कार्यशाळा :** गुणवत्ता वाढविण्यासाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाद्वारे १५ ते ३० नोव्हेंबर दरम्यान **दोन्ही स्पर्धांसाठी ऑनलाईन कार्यशाळा!** नोंदणी करणाऱ्या शाळांना/गटांना दिनांक व वेळ कळवली जाईल. अवश्य सहभागी व्हा!

गुगल फॉर्म

स्पर्धा तपशील

**संपर्क : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०, ☎ ०२०-२४२०७ १७४/१७५**
**संकेतस्थळ - www.chhatraprabodhan.org**

## दिवाळी अंकातील भेट - आकर्षक आकाशकंदील




आकृती १

या अंकात मधोमध दिलेले २ जाड कागद अंकापासून वेगळे करून घ्या! त्यात छापलेली आकृती बाह्य रेषेवरून कापून घ्या. **(आकृती १ प्रमाणे)** सर्व तुटक रेषांवर घड्या घाला. चिकटपट्ट्यांच्या *फेव्हिकॉलद्वारे* दुसऱ्या टोकाच्या कागदावर चिकटवून घ्या. आकाशकंदिलातील निमुळत्या होत गेलेल्या भागाला रबरबँड लावून तो अधिक सुबक करा. खालच्या बाजूस पतंगी कागदाच्या झिरमळ्या लावा.) आकाशकंदिलला वरील बाजूस दोन छिद्रे दिली आहेत. तेथे लटकवण्यासाठी दोरा बांधून घ्या. तयार झालेले दोन आकाशकंदील घराच्या तोरणाच्या दोन्ही बाजूंना लावून प्रवेशदाराची शोभा वाढवा. आकाशकंदिलावरील चिन्हे व शब्द यांचे अर्थ अवश्य समजून घ्या.



**सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!**

आकाशीचे प्रकाशवैभव भूवरी अवतरले ।
दीपावलीने आनंदाचे सप्तसूर छेडले ।।

✻ शुभेच्छुक ✻
जिथे जायचे ठरले तेथे आम्ही जाऊच जाऊ ।
'छात्र प्रबोधन' च्या साथीने उज्ज्वल यश मिळवू ।।

## स्वप्न पाहूया उजळ उद्याचे

स्वप्न पाहूया उजळ उद्याचे
काळोखावर घालुनी घाव।
गावाकडची आम्ही लेकरे
भीती आम्हाला कसली राव? ।। ध्रु.।।

शिवार अमुचे हिरवे रान
झरे मोकळे झुळझुळ गान।
निसर्ग अमुचा आम्हीच राखू
ओरबाडण्या देऊ न वाव ।।१।।

शक्ती-भक्तीचा मेळ आगळा
शव-तुकयाची आण मनाला
तालीम - देऊळ दोन्ही घडवून
लंघून सीमा पुढेच धाव ।।२।।

कष्टांना ना भिणार कधीही
रगडून वाळू काढू तेलही
जगी कुठेही गेलो तरीही
स्मरून जगवू, सजवू गाव ।।३।।

आज जरीही हाती अमुच्या
माय काळी अन् काठी-बरच्या
ह्याच मुशीतून कातळ फोडून
शुद्ध जळाला देऊ रिघाव ।।४।।


**SANTOOL**

HAPPY DIWALI

We specialize in providing manufacturing services where functional and process challenges are evident. We mainly cater to the customers needing high precision. We are committed to achieving higher quality standards in manufacture and supply of engineering items/ components/ equipment as per customers' drawings and specifications by employing appropriate technology, ensuring customers' satisfaction every time in manufacturing of components, sub-assemblies / assemblies often involving special processes.

211/4, Navi Peth, Pune - 411 030. www.santool.co.in


- सर्व देणगीदार, जाहिरातदार यांच्या अर्थसाहाय्यामुळे छात्र प्रबोधनचा हा 'सुबोध ग्रामीण' दिवाळी अंक रु. ३०/- या सवलतीच्या किंमतीत १२ हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता आला.
- सर्व लेखक, चित्रकार यांच्या दर्जेदार साहित्यकृती, चित्रकृतींमुळे हा दिवाळी अंक आशयसंपन्न व देखणा करता आला.
- सुमारे ५८ गावांमधील केंद्रप्रमुख-कार्यकर्ते-प्रबोधनदूत-शिक्षक, विद्यार्थी यांनी प्रकाशनपूर्व नोंदणी करत १२ हजार विद्यार्थ्यांपर्यंत हा दिवाळी अंक पोहोचवला.

छात्र प्रबोधन परिवारातील या सर्वांना मनापासून धन्यवाद व दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!


मुख्य कार्यालय : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे 411030 दूरभाष : ०२०-२४२०७१७४/१७५
संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org इ-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
प्रकाशन दिनांक : राष्ट्रीय सौर १६ आश्विन शके १९४७, (८ ऑक्टोबर २०२५) मूल्य ₹ ६०
मासिकाच्या नोंदणीसाठी व पुस्तकांच्या ऑनलाइन खरेदीसाठी - www.jpprakashane.org